राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल sicna shik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार
क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र. ८६/२०२५/जळगाव.

तक्रारदार	प्रतिवादी जन माहिती अधिकारी
श्री.दिपक युवराज जाधव, रा.मु.पो.म्हसावद, ता.जि.जळगाव.	उपकुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव.

सुनावणी दिनांक १६/०२/२०२६

तक्रारदार यांनी दि. ०३/०२/२०२५ रोजीच्या अर्जान्वये, "दि.१४/११/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या व दि.१९/१२/२०२२ च्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ६ (१) अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसाच्या मुदतीत जनमाहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय कोणतीही माहिती पुरविलेली नाही. तसा विहीत मुदतीत कोणताही पत्र व्यवहार केलेला नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) नुसार दंड व कलम २० (२) नुसार जनमाहिती अधिकारी यांच्यावर रू.२५०००/- शास्तीची कार्यवाही कायम करण्यात यावी. प्रथम अपिल अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसांच्या विहीत मुदतीत आदेश न देणाऱ्या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई शासन परिपत्रक क्र. केंमाअ /२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/सहा. दिनांक ३१ मार्च २००८ नुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी. सोबतच मला झालेला आर्थिक, शारिरीक व मानसिक त्रासापोटी मला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) (ख) नुसार रू.२ लाख नुकसान भरपाई देण्यात यावे असे आदेश निर्गमीत व्हावे. सोबतच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (२) आणि कलम ७(८) चे उल्लंघन व State Information Commission Maharashtra Reminder ३-No.SCICCR No.२०१२ dated ०८ April २०२३ नुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्यास कोणतेही सार्वजनिक प्राधिकरणाने वसुल केली तर यांची गंभीर दखल घेऊन व कसुर करणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द भारतीय दंड संहिता १६८० कलम १६६ ए लोकसेवक यांनी बेईमानीपुर्वक कार्य करणे व शासकीय वैध आदेशाची अवेहलना करणे कलम १८८ या प्रमाणे संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्याच्या सुचना Chief Information Commission Maharashtra यांनी दिलेल्या आहे. त्यानुसार संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्यावर कठोर कायदेशिर गुन्हे दाखल करण्याची शिफारस शासनाकडे आपल्या स्तरावरून करण्यात यावी व आपण केलेला कारवाईचा अहवाल उलट टपाली तक्रारदारास मिळावा, ही विनंती." असे तक्रारदार यांनी नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८ (१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. १६/०२/२०२६ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी विद्यमान/तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून तक्रारदार अनुपस्थित होते.

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दि. १४/११/२०२२ रोजीच्या मुळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१/०१/२०१९ ते ३१/१२/२०२१ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ चे उपकलम १ ते १७ बाबीची माहिती आपणांस दर वर्षी १ जानेवारी व १ जुलै रोजी कायद्यान्वये आपल्या अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक प्राधिकरणाच्या उपविभाग निहाय कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्याचे अवबंधन आहे. त्यानुसार आपण जेथे जेथे मराठीतुन माहिती प्रकट केली त्या ठिकाणाचे पत्ते फोटोसह सी.डी.मध्ये मिळावे."

४) आयोगाने व्दितीय अपील क्र. ५८०/२०२३/जळगाव संदर्भात दि.२५/०४/२०२४ रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीअंती दि.०८/०१/२०२५ अन्वये खालील प्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, ता.जि.जळगांव. यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक-१४/११/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे."

५) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी दि.१७/०४/२०२५ अन्वये अहवाल सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की, श्री. दिपक युवराज जाधव, मु. पो. म्हसावद, ता. जि. जळगाव यांनी मा.राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ यांच्याकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिल क्र.५८०/२०२३ च्या अनुषंगाने दि.२५.०४.२०२४ रोजी संपन्न झालेल्या सुनावणीचे आदेश दि.०८/०१/२०२५ अन्वये प्राप्त झाले होते. सुनावणी आदेशाची प्रत जोडलेली आहे. प्राप्त झालेल्या आदेशानुसार विद्यापीठाच्या कुलसचिव कार्यालयाचा जनमाहिती अधिकारी या नात्याने दि.२५/०१/२०२५ अन्वये माझा लेखी खुलासा मा. आयोगाकडे सादर केला होता. दि.२५.०१.२०२५ रोजीच्या खुलासा पत्राची प्रत जोडलेली आहे. तथापि, जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याबाबत मा. राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०२.२०२५ अन्वये दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वरील दि.०४/०४/२०२५ वरील पत्र विद्यापीठ कार्यालयास दि.११ एप्रिल, २०२५ रोजी प्राप्त झालेले आहे. त्या अनुषंगाने मा. आयोगाने पारित केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा वस्तुस्थितीदर्शक स्वयंस्पष्ट अहवाल सादर करतो तो येणेप्रमाणे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नुसार श्री. जाधव यांचा दि.१४.११.२०२२ रोजीचा माहिती अधिकारांतर्गत अर्ज कुलसचिव कार्यालयास प्राप्त झाला होता. त्यान्वये त्यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ चे उपकलम १ ते १७ बाबीची माहिती दरवर्षी ०१ जानेवारी व ०१ जुलै रोजी कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणाच्या उप विभागनिहाय कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्याचे अवबंधन आहे. त्यानुसार विद्यापीठाने जेथे जेथे मराठीतुन माहिती प्रकट केली, त्या ठिकाणच्या माहितीची मागणी केली होती. उपरोक्त अनुषंगाने नम्रपणे नमूद करु इच्छितो की, श्री. जाधव यांनी दि.१४.११.२०२२ रोजीच्या माहिती अधिकारांतर्गत अर्ज तसेच दि.०८.१२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये वरीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती. त्या अनुषंगाने प्राप्त आदेशानुसार विद्यापीठाच्या प्रशासकीय विभागांचे जनमाहिती अधिकारी यांचे पदनाम व अंतर्गत दूरध्वनी क्रमांक असलेला एक फलक तयार करुन सदरचा फलक विद्यापीठाच्या दर्शनी भागात लावण्यात आला होता. याबाबतची माहिती श्री. जाधव यांना यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आली होती. माहितीची प्रत जोडलेली आहे. तसेच याच अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ व ५ च्या संदर्भात अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबंधितांना दि.१०.०१.२०२५ पत्र पाठविण्यात आले होते. दि.१०.०१.२०२५ रोजीच्या पत्राची प्रत जोडलेली आहे. त्याचप्रमाणे द्वितीय अपिल क्र.५८०/२०२३ च्या अनुषंगाने मा. राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ यांचेकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना विद्यापीठ पत्र जा.क्र. कबचौउमवि/२/मा.अ./१२/२०२५, दि.१६.०१.२०२५ अन्वये कळविण्यात आले होते. दि.१६.०९.२०२५ रोजीच्या पत्राची प्रत जोडलेली आहे. वरील बाब श्री. जाधव यांना विद्यापीठ पत्र जा.क्र. कबचौउमवि/२/द्वितीय अपिल क्र.५७९ व ५८०-२०२३/१३/२०२५, दि.१६.०१.२०२५ अन्वये कळविण्यात आली होती. श्री. जाधव यांना दिलेल्या दि.१६.०१.२०२५ रोजीच्या पत्राची प्रत नि. क्र. ६ वर जोडलेली आहे. विद्यापीठ पत्र जा.क्र. कबचौउमवि/२/मा.अ./१२/२०२५, दि.१६.०१.२०२५ च्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी, संशोधन विभाग, कबचौउमवि., जळगाव, जनमाहिती अधिकारी तथा संचालक, भौतिकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि., जळगाव, जनमाहिती अधिकारी तथा संचालक, जैवशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि., जळगाव यांनी आवश्यक ती माहिती श्री. जाधव

यांना पाठविलेली आहे. दि.१६.०१.२०२५ रोजीच्या पत्राची प्रत व संबंधितांनी श्री. जाधव यांना पाठविलेली माहिती जोडलेली आहे. तसेच या अनुषंगाने सादर करावयाच्या विवरण पत्राची प्रत जोडलेली आहे. तरी कृपया उपरोक्त अनुषंगाने वरीलप्रमाणेचा वस्तुस्थितीदर्शक स्वयंस्पष्ट अहवाल व त्यासोबत जोडलेल्या विवरणपत्राचा स्वीकार व्हावा व अर्जदार श्री. जाधव यांनी मा. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली तक्रार क्र.८६/२०२५ निकाली काढण्यात यावी ही, आदरपूर्वक विनंती.

६) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, आयोगाने व्दितीय अपील क्र. ५८०/२०२३/जळगाव संदर्भात दि.०८/०१/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानूसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, यांनी दि. १६/०१/२०२५ च्या पत्रान्वये तक्रारदार यांना माहिती पुरविली असल्याचे दिसून येते तर उर्वरीत माहितीबाबत संबंधीत जन माहिती अधिकारी यांना दि.१०/०१/२०२५ च्या पत्रान्वये अर्जदारास व्यक्तीश: अथवा पोस्टाव्दारे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या सुचना निर्गमित केल्याचे दिसून येते. त्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि.१८/०२/२०२५ व दि.२४/०२/२०२५ च्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे निदर्शनास येते. आयोगाच्या आदेशानूसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली असून तक्रारदार यांना माहिती पुरविली असल्याचे निदर्शनास येते. तसेच, प्रत्यक्ष सुनावणीवेळी तक्रारदार अनुपस्थित असून, त्यांना कोणती माहिती मिळाली नाही याबाबत काहीही सिध्द केलेले नाही. त्यामुळे, सदर तक्रार पूढील चौकशी योग्य नाही.

आदेश

प्रस्तूत तक्रार क्र.८६/२०२५/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जा.क्र. ३३८८ दि. ०८/०५/२०२५
